# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानरपालिकेच्या विवीध विभाग व झोनल कार्यालयाकरीता
**{सामान्य प्रशासन विभाग}** दैनंदीन कामाकरीता लागणारे आवश्यक स्टेशनरी व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी प्रतिवर्ष रू.५०/- लक्ष खर्चाची (०३ वर्षाकरीता) Tender ID_२०२१_NMCN_६४१७४०_१ दि.२९.०१.२०२१ चे अनुषंगाने प्राप्त झालेल्या दरात वाटाघाटी करून अंतिम करण्यात आलेल्या दरकराराचे दरास स्थायी समिती ठराव क्र.६५ दि.२४.०८.२०२१ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

यानुसार सामान्य प्रशासन विभागामार्फत रू.५०/- लक्ष वार्षीक खर्चाचे अधिन राहून हे विभाग विवीध विभागाकरीता तथा झोनल कार्यालयाकरीता स्टेशनरी व साहित्य खरेदी करून पुरवठा करीत असते. सामान्य प्रशासन विभागाचे स्टेशनरी दरकराराचा आधार घेवून काही विभाग तसेच झोनल कार्यालये त्यांना आवंटीत व्यय पदाअंतर्गत स्टेशनरी खरेदी करीत होते. परंतु इतर विभागांनी स्टेशनरी खरेदी त्यांचे स्तरावर न करता केंद्रिय स्तरावरून करणेची मागणी करित असल्याने स्टेशनरी खरेदीचा संपुर्ण भार केंद्रीय स्तरावर आल्याने विभागास स्टेशनरीची विहीत मर्यादा रू.५०/- लक्ष वार्षीक अपुरी पडत आहे. विभागांची गरज भागवावयाची झाल्यास याखर्चात रू.२५/- लक्ष वाढवून रू.७५/- लक्ष वार्षीक स्टेशनरी खरेदी मर्यादा विहीत करणेस्तव ठरावाचे प्रारूप प्रशासक ठरावाचे मान्यतेस्तव ठेवण्यात येत आहे.

खर्च पद क्र.A२०१००१२०२१४ स्टेशनरी खरेदी या व्ययशिर्षा मधून राहील.
टिप:- विस्तृत टिपणी नस्तित उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 443/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 28/06/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहाय्यक आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानरपालिकेच्या विवीध विभाग व झोनल कार्यालयाकरीता दैनंदीन कामाकरीता लागणारे आवश्यक स्टेशनरी व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी प्रतिवर्ष रू.५०/- लक्ष खर्चाची (०३ वर्षाकरीता) Tender ID_२०२१_NMCN_६४१७४०_१ दि.२९.०१.२०२१ चे अनुषंगाने प्राप्त झालेल्या दरात वाटाघाटी करून अंतिम करण्यात आलेल्या दरकराराचे दरास स्थायी समिती ठराव क्र.६५ दि.२४.०८.२०२१ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

यानुसार सामान्य प्रशासन विभागामार्फत रू.५०/- लक्ष वार्षीक खर्चाचे अधिन राहून हे विभाग विवीध विभागाकरीता तथा झोनल कार्यालयाकरीता स्टेशनरी व साहित्य खरेदी करून पुरवठा करीत असते. सामान्य प्रशासन विभागाचे स्टेशनरी दरकराराचा आधार घेवून काही विभाग तसेच झोनल कार्यालये त्यांना आवंटीत व्यय पदाअंतर्गत स्टेशनरी खरेदी करीत होते. परंतु इतर विभागांनी स्टेशनरी खरेदी त्यांचे स्तरावर न करता केंद्रिय स्तरावरून करणेची मागणी करित असल्याने स्टेशनरी खरेदीचा संपुर्ण भार केंद्रीय स्तरावर आल्याने विभागास स्टेशनरीची विहीत मर्यादा रू.५०/- लक्ष वार्षीक अपुरी पडत आहे. विभागांची गरज भागवावयाची झाल्यास याखर्चात रू.२५/- लक्ष वाढवून रू.७५/- लक्ष वार्षीक स्टेशनरी खरेदी मर्यादा विहीत करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(खर्च पद क्र.A२०१००१२०२१४ स्टेशनरी खरेदी या व्ययशिर्षा मधून राहील.)

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**